संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ४४ वा ● ● सोमवार दि. ७ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025





महाराष्ट्रातील ४४ रेल्वे स्थानकांचा समावेश

## प्रधानमंत्री मोदींच्या हस्ते 'अमृत भारत स्थानक' योजनेचा शुभारंभ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** देशातील रेल्वे स्थानकांच्या आधुनिकीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या 'अमृत भारत स्थानक' योजनेचा शुभारंभ आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला. या योजनेत महाराष्ट्रातील ४४ रेल्वे स्थानकांचा समावेश केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहेत.

यापूर्वीच केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या रेल्वे प्रकल्पांसाठी १३ हजार ५३९ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे, त्यातून राज्यातील १२३ रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येत असून या स्थानकांमध्ये मूलभूत पायाभूत तसेच अद्ययावत सुविधा आणि रेल्वे मार्गांची कामे सुरू आहेत, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.



नवी दिल्ली : 'अमृत भारत स्थानक' योजनेचा शुभारंभ करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

देशातील रेल्वे स्थानकांच्या दृष्टीने आजचा दिवस अतिशय महत्त्वाचा आहे. देशातील ५०८ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्यासाठी 'अमृत भारत स्थानक' योजनेचा शुभारंभ झाला आहे. या योजनेतून निर्माण होणाऱ्या सुविधांमुळे रेल्वे स्थानकांचा चेहरामोहरा बदलणार आहे, शिवाय प्रवाशांना दर्जेदार सुविधा मिळणार आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. 'अमृत भारत स्थानक' योजनेमुळे रेल्वे स्थानकांचे पुनरुज्जीवन होईल, शिवाय रेल्वे स्थानकातील प्रवेशाची ठिकाणे आणि स्थानक परिसराचा विकास, प्रतिक्षालये, स्वच्छतागृहे, लिफ्ट, एस्कलेटर, मोफत वायफाय, स्थानिक उत्पादनांच्या विक्रीसाठी स्वतंत्र केंद्रे, प्रवाशांना माहिती देण्यासाठी उद्घोषणा प्रणाली, दिव्यांगासाठी सुविधा आदी सुविधा टप्प्या-टप्प्याने करण्यात येणार आहेत, असे सांगून या विविध पायाभूत सुविधांच्या नव्या अध्यायाची नोंद रेल्वेच्या इतिहासात होईल, असा विश्वासही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

**महाराष्ट्रातील रेल्वे स्थानके**

अहमदनगर, दौंड, कोपरगाव, कुर्डुवाडी जंक्शन, लातूर, उस्मानाबाद, पंढरपूर, सोलापूर, आकुर्डी, कोल्हापूर, तळेगाव, बडनेरा, मलकापूर, चाळीसगाव, मनमाड, शेगाव, वडसा, गोंदिया, चांदाफोर्ट, बल्लारशाह, चंद्रपूर, धामणगाव, गोधनी, हिंगणघाट, काटोल, सेवाग्राम, नरखेड, पुलगाव, कांजुरमार्ग, परळ, विक्रोळी, औरंगाबाद, गंगाखेड, हिंगोली डेकन, जालना, किनवट, मुदखेड, नगरसोल, परभणी, परतूर, पूर्णा, सेलू, वाशिम, परळी वैजनाथ

## तासगावात रुपेश पेटकर याच्यावर हल्ला करणारा जेरबंद

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** येथील बागणे चौकात काल सकाळी केळी विक्रेत्यांमध्ये जागेवरून वाद झाला. हा वाद विकोपाला जाऊन रुपेश पेटकर याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. याप्रकरणी मंगेश अनिल रसाळ याला जेरबंद करण्यात आले आहे. रसाळ याला एलसीबीच्या पथकाने नांद्रे येथून अटक केली.

याबाबत माहिती अशी, तासगाव शहरातील बागणे चौकात केळी विक्रेते बसतात. गेल्या काही दिवसांपासून केळी विक्रेत्यांमध्ये बसण्याच्या जागेवरून वाद सुरू आहे. याच कारणावरून अनेक वेळा हमरी-तुमरी झाली आहे. काल (रविवारी) सकाळी रुपेश पेटकर व मंगेश रसाळ यांच्यात वाद झाला.

हा वाद विकोपाला जाऊन एकमेकांच्या अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न झाला. यातूनच रसाळ याने पेटकर यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला चढवला. यामध्ये पेठकर गंभीर जखमी झाला आहे. त्याला सांगली येथील सिनर्जी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान पेटकर याच्यावर हल्ला केल्यानंतर हल्लेखोर रसाळ हा फरार झाला होता. त्याचा तासगाव पोलीस तसेच एलसीबीचे पथक शोध घेत होते. अखेर एलसीबीच्या पथकाने नांद्रे येथून रसाळ याच्या मुसक्या आवळल्या.त्याला तासगाव पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

## अमित शाहांची भेट घेतलीच नाही : जयंत पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. मात्र, या सर्व चर्चा जयंत पाटलांनी फेटाळून लावल्या असून माझी कोणाशीही चर्चा झाली नाही, मी अमित शाह यांना भेटलो नसल्याचे स्पष्टीकरण पाटलांनी दिले.



जयंत पाटील

प्रसारमाध्यमांवरील बातम्या ऐकल्या आणि माझे मनोरंजन झाले. मी कालही पवार साहेबांना भेटलो. शनिवारी रात्री मी माझ्या पक्षातले वरिष्ठ आमदार आहेत, त्यांच्याशी चर्चा केली आणि सकाळी देखील मी पवार साहेबांना भेटलो. त्यामुळे ज्या बातम्या चालवल्या आहेत, त्यामध्ये तथ्य नाही. मी पुण्यात भेटलो किंवा अन्य कुठे भेटलो, यात कुठलीही स्पष्टता नाही, असे जयंत पाटलांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

मी अमित शाह यांना कधी भेटलो याचे संशोधन करा. याबद्दलच्या चर्चा कोण करतंय, त्याबाबतही चौकशी करा. मी कालही इथेच होतो आणि आजही इथेच आहे. ज्या बातम्या पसरवल्या जात आहेत, त्या बातम्यांमध्ये कुठेतरी कोणी गैरसमज पसरवत आहे, असं मी म्हणणार नाही, कारण या बातम्या माध्यमांवरच्या आहेत. मात्र, माझी सर्वांना विनंती आहे, अशा बातम्या चालवताना खात्री बाळगूनच चालवायला हव्यात, असेही पाटील म्हणाले. जर अशा पद्धतीने कुणाला भेटायचे असेल तर तुम्हाला सांगेल. तुम्हाला सांगूनच जाईल. भाजप अशा प्रकारच्या बातम्या पेरतो असे मी म्हणणार नाही. कारण बातम्या पेरणारे तुम्ही. त्यांना बडबडून काय उपयोग?, कुणी बातम्या पेरल्या याची माहिती सध्यातरी माझ्याकडे नाही, असे स्पष्टीकरण देत जयंत पाटलांनी चर्चांना पूर्ण विराम दिला.

## दहिवडीचे सपोनि अक्षय सोनवणे विशेष पुरस्काराने सन्मानित



सातारा : येथे जिल्हा पोलीस प्रमुख समीर शेख यांच्याकडून पुरस्कार स्विकारताना सपोनि अक्षय सोनवणे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** दहिवडी पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक अक्षय सोनवणे यांना जिल्हा पोलीसप्रमुख समीर शेख आणि अप्पर पोलीस अधीक्षक बापू बांगर यांच्या हस्ते विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सपोनि अक्षय सोनवणे यांनी दहिवडी पोलीस स्टेशनचा कारभार स्वीकारल्यानंतर उल्लेखनीय कामगिरी केली.

दहिवडी पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना ६० ते ६५ सीसीटीव्ही तपासून, विशेष पथक तयार करून, प्रसंगावधान दाखवून, तातडीने व जलद कार्यवाही केल्यामुळे अवघ्या चार तासात शोधून त्यांच्याकडून गुन्ह्यातील जवळपास ८० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पोलीस अधीक्षक सातारा समीर शेख आणि अप्पर पोलीस अधीक्षक बापू बांगर यांनी २५ हजार रुपये बक्षीस रोख रक्कम आणि प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित केले.

आजपर्यंत त्यांनी सीसीटीव्हीच्या आधारे चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावणे, विशेष पथक तयार करत प्रसंगावधान दाखवून तातडीने व जलद कारवाई केल्या बद्दल हे मानांकन देण्यात आलं आहे. या एकंदरीत कामगिरीबद्दल जिल्हा पोलिस प्रमुखांनी त्यांना रोख पंचवीस हजार रुपये बक्षीस आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरवले आहे. यावेळी पोलीस हवालदार बापू खांडेकर, धनंजय घाटगे, पोलीस नाईक स्वप्नील म्हामणे, रामचंद्र गाढवे, अजिनाथ नरबट, सुहास गाडे, सागर लोखंडे, निलेश कुदळे आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्रात औरंग्याची औलाद खपवून घेणार नाही : उद्धव ठाकरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** भाजप फक्त आयारामांचा पक्ष झाला असल्याची टीका माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांनी केली. रंगशारदा सभागृहात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि संभाजी ब्रिगेड पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे म्हणाले, आजसुद्धा औरंगजेब जीवंत आहे. शिवसेना फोडणारा औरंगजेब जीवंत आहे. राष्ट्रवादी फोडणारा औरंगजेब जीवंत आहे. ही औरंग्याची वृत्ती भाजपमध्ये आहे. अशी वृत्ती महाराष्ट्रामध्ये नाही. महाराष्ट्र हे मराठ्यांचे राज्य आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे राज्य आहे.



उद्धव ठाकरे

राज्यातील भगवी ताकद फोडण्याचं काम औरंग्याच्या वृत्तीने केली आहे. औरंगजेब तुमच्यामध्ये दडलेला आहे. आमच्यामध्ये नाही. औरंगजेबाच्या घराणेशाहीचा इतिहास असेल, तर हा भाजपच्या घराणेशाहीचा इतिहास असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली. भाजप हे आयारामांचे मंदिर बांधत आहेत. आसाममध्ये आयाराम मुख्यमंत्री बनवले. राज्यात आयाराम मुख्यमंत्री बनवले. ज्यांना फोडायचं त्यांनाच एकमेकांत भिडवायचं अशी यांची कुटनीती आहे. शिवसेना-शिवसेना भांडतील. राष्ट्रवादी काँग्रेस-राष्ट्रवादीचे लोकं भांडतील. परस्पर मरतील. माझ्या कपड्यावरती डाग नाही. ज्यांचे कपडे धुऊन पाहिजे असतील आमच्याकडे या, अशी भाजपची नीती असल्याचा आरोपही उद्धव ठाकरे यांनी केला.

रक्षाबंधन मुस्लीम महिलांकडून करून घ्या, अशा सूचना एनडीएतील खासदारांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्या आहेत. पण, मणिपूरमध्ये ज्या महिलांची धिंड काढण्यात आली त्या महिलांकडून बांधून घ्या, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. मुस्लीम महिलांकडून राखी बांधू घ्यायची असेल, तर मीलकीस बानूकडून बांधून घ्या. बानू गर्भवती असताना तिच्या तीन वर्षांच्या मुलीला मारलं. तिच्या गुन्हेगारांना गुजरात सरकारने सोडलं. हिंमत असेल,तर बिल्किस बानूकडून रक्षाबंधन करून घ्या, असा सल्ला उद्धव ठाकरे यांनी दिला.

उद्धव ठाकरे म्हणाले, आमच्या घराण्याचा इतिहास आहे. सहा-सात पिढ्या जनसेवा करतात. भाजप उभा राहिला तरी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना संपवू शकत नाही. हिंदुत्व हे हिंदुत्वच आहे. ते काही कुणाचं वेगळं नाही. काळानुरूप काही भूमिका घ्याव्या लागतात. प्रबोधनकारांनी घेतल्या. बाळासाहेब ठाकरे यांनी घेतल्या. आता मी काही भूमिका घेतो. आमचं हिंदुत्व हे शेंडी जानव्याचं हिंदूत्व नाही, असा खोचक टोलाही उद्धव ठाकरे यांनी भाजपला लगावला.




## आटपाडीतील अट्टल गुन्हेगार एकवर्षासाठी हद्दपार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी पोलीस ठाणे हद्दीतील मालतत्तेच्या गुन्हयातील रेकॉर्डवरील गुन्हेगार दौलुशा रामा पवार, रा. सोमेश्वरनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि.सांगली याची दिवसें दिवस बळावत चाललेल्या गुन्हेगारी स्वरुपाच्या वर्तनास पायबंद घालणेकरीता त्याचेविरूध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६(१)(अ)(ब) प्रमाणे हद्पपारीचा प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकारी विटा विभाग, विटा यांचेकडे पाठविण्यात आलेला होता.

सदर पाठविलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने सुनावणी होवून उपविभागीय दंडाधिकारी विटा विभाग, विटा यांनी आटपाडी पोलीस ठाणेकडील रेकॉर्डवरील गुन्हेगार दौलुशा रामा पवार यास सांगली, सातारा व सोलापूर या तीन जिल्हयातून १ वर्षासाठी हद्दपार केले आहे. दौलुशा रामा पवार यास हद्दपार केलेबाबतच्या नोटीसची आज दि.०५.०८.२०२३ रोजी बजावणी करून त्यास उस्मानाबाद जिल्हयातील तुळजापूर येथे सोडण्यात आलेले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक सांगली डॉ बसवराज तेली, अपर पोलीस अधीक्षक तुषार पाटील व उपविभागीय पोलीस अधिकारी पदमा कदम यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरद मेमाणे, सहा.पोलीस निरीक्षक दत्तात्रय कोळेकर, सपोफौ चव्हाण, पोहेकॉ उमर फकीर, पोकॉ प्रमोद रोडे यांनी केली आहे.



आरोपी दौलुशा पवार






# संपादकिय

## फडणवीस मस्टरवर एन्ट्री करणारे राहणार का?

२०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेना भाजप युतीला स्पष्ट बहुमत मिळाले असताना ही सुरुवातीची अडीच वर्ष मुख्यमंत्री कोण या चर्चेवरून भाजप शिवसेना युती तुटली अन राज्यात महाविकास आघाडी होत शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेस यांचे सरकार सत्तेत आले. यामध्ये शिवसेनेकडून उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले.

परंतु इकडे शिवसेनेने दगा दिल्याने भाजपणे शिवसेना पर्यायाने उद्धव ठाकरे यांना धडा शिकविण्याच्या इराद्याने शिवसेना फोडत एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करत भाजप सत्तेवर आला. भाजपचे देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले. परंतु इकडे अजूनही त्यांचे मन रमत नसल्याने त्यांनी सुरुवातीला दगाफटका दिलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला देखील झटका देत राष्ट्रवादी काँग्रेसला सत्तेत सामावून घेतले. परंतु यामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मात्र पक्षात देखील वजन कमी होवू लागले की काय? अशा वावड्या देखील उडू लागल्या.

काल  ठाकरे गट आणि संभाजी ब्रिगेडचा संयुक्त मेळावा रविवारी मुंबईतील रंगशारदा सभागृहात पार पडला. या मेळाव्यात बोलताना उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खोचक टोले लगावले. पक्ष फोडाफोडीच्या राजकारणावर भाष्य करत फडणवीसांची मला दया येते, फडणवीस फक्त मस्टरवर एन्ट्री करणारे राहणार आहेत, असे म्हणत ठाकरेंनी भाजपसह फडणवीसांना डिवचले.

देवेंद्र फडणवीस तुम्ही किती ओझी वाहणार आहात. दया येते मला त्यांची. सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही, अशी त्यांची परिस्थिती झाली आहे. एक चोरला, दुसरा चोरला, आता काँग्रेस देखील फोडणार असे म्हणतात. किती उपमुख्यमंत्री करणार?, मग काय फडणवीस फक्त मस्टरवर एन्ट्री करणारे राहणार का?, असा घणाघात ठाकरेंनी केला.

भाजप संपूर्ण उभा राहिला तरी उद्धव बाळासाहेब ठाकरेंना संपवू शकत नाही. आम्हाला थप्पड देण्याची कुणाची हिम्मत नाही. ठाकरेंच्या घराण्याला इतिहास आहे. आमच्या सहा, सात पिढ्या जनसेवा करत आहेत. ज्यांना आगापीछा नाही, त्यांनी टीका करू नये, अशा शब्दात ठाकरेंनी भाजपला आव्हान दिलं. त्यांमुळे खरच उद्धव ठाकरे म्हणतात तसे देवेंद्र फडणवीस हे फक्त मस्टरमंत्री होवू नये म्हणजे झाले.




# म्हसवड-पुळकोटी रस्ता देतोय अपघाताला निमंत्रण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** म्हसवड शहरातुन पुळकोटी, जांभुळणी या सह पुढे सांगली जिल्ह्यात जाणाऱ्या रस्त्यावर असंख्य खड्डे पडले असुन या खड्डयातुन वाट काढणे हे वाहनचालकांसमोर एकप्रकारे दिव्यच आहे. या खड्डयांमुळे यापुर्वी अनेक छोटे-मोठे अपघात झाले आहेत. अपघातांमुळे अनेकजण जायबंदीही झाल्याच्या घटना घडत आहेत मात्र याकडे आजवर अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी या खड्डयांकडे पाठ फिरवल्याने अपघातांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे.

माण तालुका म्हटले की दुष्काळी असे संबोधले जाते. या तालुक्याचा तसा विकासही कासवगतीनेच होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातुन शहराला जोडणारे अनेक रस्त्यांची अवस्था ही अत्यंत दैयनिय आहे. म्हसवड शहर हे तसे तालुक्यात सर्वात मोठे व नगरपरिषदेचे अन् मोठ्या बाजारपेठेचे शहर म्हणुन ओळखले जाते. याच शहरात सुप्रसिद्ध असे श्री.सिध्दनाथ व माता जोगेश्वरी देवीचे प्राचीन असे हेमाडपंथी मंदिर आहे. या मंदिरात दररोज हजारो भाविकगण देवदर्शनासाठी येत असतात तर तालुक्यातील सर्वाधिक मोठी बाजारपेठही याच शहरात असल्याने परिसरातील



**म्हसवड : म्हसवड-पुळकोटी रस्त्यावर पडलेल्या खड्यामुळे वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून छोटे-मोठे अपघात होत आहेत**

व लगतच्या तालुक्यातीलही व्यापारी वर्ग याच शहरात नेहमीच येत आहे. अशातच या शहरात आता मोठ मोठी रुग्णालयेही झाली असल्याने परिसरातुन असंख्य रुग्ण याठिकाणी येत आहेत. मात्र रुग्णांना अन् बाजारातुन माल खरेदी करुन जाताना या शहराला जोडणारे रस्तेच ठिकठाक नसल्याने अनेकदा अडचणी येत आहेत. म्हसवड शहरातुन पुळकोटी याठिकाणी जाणासाठी असणाऱ्या रस्त्याची तर अवस्था फारच गंभीर बनली आहे. सध्या या रस्त्यावरील असंख्य खड्डयांमुळे वाहनचालकाला खड्डयांतुन रस्ता शोधावा लागत आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या या रस्त्याकडे संबंधित विभागाचे साफ दुर्लक्ष झाल्याने रस्त्याची वाट लागली आहे. पुळकोटी कडुन म्हसवडकडे येणाऱ्या रस्त्याची अवस्था तशी जरा बरी आहे. मात्र मेगासिटी पासुन पुढे म्हसवडकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था फार गंभीर बनली आहे. दोन्ही बाजुकडुन रस्त्याची डांबरीकरण झाले आहे मात्र मध्येच सुमारे २०० मीटर रस्त्याचे काम झाले नसल्याने या दोनशे मीटरवरील रस्त्यामध्ये २०० हुन अधिक खड्डे पडले आहेत.

हे खड्डे जवळपास पाच ते ६ फुट रुंदीचे असल्याने या महाकाय खड्डयांतुन मार्ग काढणे वाहनचालकाला जिकीरीचे बनले आहे. सध्या माण तालुक्यात पावसाची भुरभुर सुरु आहे. अशा भुरभुर पावसानेही हे खड्डे भरत आहेत त्या खड्डयांमध्ये पावसाचे पाणी साचल्याने वाहनचालकांना खड्डयांचा अंदाज येत नाही. त्यामुळे अनेकदा वाहनांचे अपघात होवुन वाहनधारक जखमी होण्याचे प्रमाण वाढले आहे. विशेषत: दुचाकीस्वाराला तर यातुन मार्गक्रमण करणे म्हणजे एकप्रकारे दिव्य पार करण्याप्रमाणे बनले आहे.

रात्री-अपरात्री रुग्णाला घेवुन म्हसवडकडे येणाऱ्या वाहनाला ही या खड्डयांचा फटका बसत आहे. त्यामुळे पाऊस मोठा सुरु होण्यापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने या मार्गावरील किमान खड्डे भरण्याचे तरी साहस दाखवावे अशी मागणी या मार्गावरील सर्वच वाहनचालकांनी व नागरीकांनी केली असुन बांधकाम विभागाचे अधिकारी हे खड्डे भरण्याचे औदर्य दाखवतील का? असा सवाल वाहनधारक उपस्थित करत आहेत.

# महाराष्ट्राच्या विकासात सहकार क्षेत्राचे मोठे योगदान : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** महाराष्ट्राच्या विकासात सहकार क्षेत्राचे मोठे योगदान आहे, विशेषत: पश्चिम महाराष्ट्राच्या विकासात सहकार क्षेत्राचे योगदान मोठे आहे. राज्यात २ लाख २० हजार सहकारी संस्था असून ६०० पेक्षा अधिक बहुराज्य संस्था आणि सोसायट्या कार्यरत आहेत. केंद्र शासनाचे नवे पोर्टल सहकार क्षेत्राच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरेल असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. केंद्रीय सहकारी संस्था निबंधक कार्यालयाच्या डिजीटल पोर्टलच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले,  केंद्राच्या सहकार विभागाने अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहेत. केंद्र सरकार सहकार क्षेत्राच्या विकासाकडे अत्यंत सकारात्मकतेने लक्ष देत आहे. नव्या पोर्टलमुळे नोंदणीची स्थिती, नोंदणी, आदेश, सोसायटीचे प्रमाणपत्र, विवरण सामान्य शेतकऱ्यांना उपलब्ध होतील. राज्यात सहकारी संस्थांमध्ये ५ कोटी २८ लाख सदस्य आहेत. सहकारी बँकेमधील ठेवी २ लाख ३१ हजार कोटीपेक्षा जास्त आणि खेळते भांडवल साडेचार लाख कोटींपेक्षा जास्त आहेत. या चळवळींचा



**पुणे : येथे केंद्रीय सहकारी संस्था निबंधक कार्यालयाच्या डिजीटल पोर्टलच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

मोठा आधार प्राथमिक कृषी सहकारी संस्था (पॅक्स) आहेत. देशातील सर्वाधिक २१ हजार पॅक्स महाराष्ट्रात आहेत ही अभिमानास्पद बाब आहे. या संस्थांना बळकटी देण्याचे कार्य केंद्राच्या सहकार मंत्रालयाने केले आहे.

शेतकऱ्यांला केंद्र बिंदू मानून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे कार्य केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून केले. सहकार क्षेत्र कठीण काळातून जात असतांना  'सहकार से समृद्धी' या उद्देशाने सहकार विभागात अनेक सकारात्मक बदल करण्यात येत आहेत.  सहकार क्षेत्रात पारदर्शकता येत आहे.

महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचा १० हजार कोटी रुपयांचा आयकर माफ करण्याचा मोठा निर्णय घेऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे कार्य त्यांनी केले. यामुळे साखर उद्योगालाही नवसंजीवनी मिळाली आहे. यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. पॅक्सच्या संगणकीकरणामुळे राज्यातील १२ हजार सहकारी संस्थांना याचा फायदा होईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.




# नागेश चांडोले यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**बोंबेवाडी : गुरुकुल विद्यालय येथे नागेश चांडोले यांच्या वाढदिवसानिमित्त उपस्थित माजी सभापती ब्रम्हानंद पडळकर, जयवंत सरगर, अनिल पाटील, विष्णूपंत अर्जुन व मान्यवर**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** गुरुकुल विद्यालय बोंबेवाडीचे मुख्याध्यापक नागेश चांडोले यांचा वाढदिवस विद्यालयामध्ये मोठ्या उत्साहात व विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाप्त व गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषदेचे माजी सभापती ब्रम्हानंद पडळकर व युवा नेते अनिल पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी ब्रह्मानंद पडळकर यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व दहावी बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमास युवा नेते जयवंत सरगर, विष्णुपंत अर्जुन, दादा मोटे, नामदेव घेरडे, मच्छिंद्र शेजाळ, दैवत काळेल, पाडुरंग शेजाळ, दत्ता जेडगे, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

युवा नेते अनिल पाटील यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत, नागेश चांडोले यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. रावसाहेब पाटील यांनी ही मार्गदर्शन केले. दैवत काळेल यांनी शाळेबद्दलची माहिती उज्वल निकालाची यशस्वी परंपरा सांगितली.

कार्यक्रमाचे नियोजन, शिक्षक दैवत काळेल, भाऊसाहेब पवार, दत्तात्रय पुकळे, प्रविण करांडे, अमोल होमकर, पुजारी मॅडम व चांडोले मॅडम यांनी केले. यावेळी अनेक विद्यार्थी यांनी गुरुदक्षिणा म्हणुन नागेश चांडोले यांना अनेक भेटवस्तु दिल्या.




दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायक्षेत्र)

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






## तुषार ठोंबरेंना वाटेगाव जन्मभूमी पुरस्कार प्रदान



वाटेगाव : येथे तुषार ठोंबरे यांना पुरस्कार प्रदान करताना सचिन साठे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**विटा :** साहित्यरत्न, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समिती वाटेगाव व साठे कुटुंबाच्या वतीने १०३ व्या जयंतीनिमित्त मानव हित लोकशाही पक्षाचे वतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समिती वाटेगाव या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते तुषार ठोंबरे यांना मानवहित लोकशाही पक्षाचे अध्यक्ष व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन साठे यांच्या हस्ते तुषार ठोंबरे यांना जन्मभूमी पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.
हा पुरस्कार सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल तुषार ठोंबरे यांना देण्यात आला. मागासवर्गीयांचा न्यायहक्क, दुर्बल वंचित घटकांचा विकास, दारिद्र्यरेषेखालील लोकांना शासकीय योजना पाठपुरावा, विविध आरोग्य शिबिरे, राजीव गांधी महिला सन्मान उपक्रम, शाळेतील विद्यार्थ्यांना विविध सामाजिक पुरुषांची जयंती व पुण्यतिथी निमित्त समाज प्रबोधन उपक्रम या सामाजिक कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला आहे.

## ओबीसी शिष्यवृत्तीसह शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनियमितेची तपासणी करणार : अजित पवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**मुंबई :** इतर मागास बहुजन कल्याण विभागातील शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेच्या अनुषंगाने आढळलेली अनियमितता तपासण्यासाठी ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत संपूर्णत: चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधान परिषदेत सांगितले.
लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागातील प्रादेशिक उपसंचालक या पदावरील नियुक्ती रद्द करण्याबाबत सदस्य आमश्या पाडवी व सचिन अहीर यांनी



अजित पवार

प्रश्न उपस्थित केला होता त्याला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. पवार बोलत होते. उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले की,इतर मागास बहुजन कल्याण विभागातील शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेच्या अनुषंगाने ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत याबाबत संपूर्णत: चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.
ईंर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे म्हणाले की, या विभागातील रिक्त पदे भरण्याच्या पार्श्वभूमीवर १९ एप्रिल २०२२ रोजी बैठक झाली होती. या बैठकीत सामाजिक न्याय विभागाच्या जात पडताळणी समितीवर कार्यरत अधिकाऱ्यांपैकी ज्या अधिकाऱ्यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागात प्रतिनियुक्तींची इच्छुकता दर्शवली होती, त्यांच्या सेवा उपलब्ध करून दिल्या होत्या.




## आटपाडी तालुक्याला जगविख्यात उद्योग नगरी बनवा !

### सादिक खाटिक यांची जयंत पाटील यांना साद

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**आटपाडी/प्रतिनिधी :** जागतिक किर्तीचे उद्योगपती एलॉन मस्क यांच्या सहकार्याने आटपाडी तालुक्याला जगविख्यात उद्योग नगरी साकारण्यासाठी आमदार जयंतराव पाटील यांनी पुढाकार घ्यावा. असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशचे महासचिव सादिक खाटीक यांनी केले आहे.
राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, माजी मंत्री, आमदार जयंत पाटील यांच्या सूचनेनुसार एक तास राष्ट्रवादी साठी, आगामी महाराष्ट्राच्या विकासासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून आटपाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश महासचिव सादिक खाटीक यांच्या निवासस्थानी गाव प्रभाग भेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातल्या विसाव्या आणि आटपाडीतल्या सतराव्या गाव-प्रभाग भेटीच्या बैठकीत बोलताना सादिक खाटीक यांनी हे आवाहन केले.
भारतात उद्योगाला प्राधान्य मिळत नाही म्हणून नाराज होऊन चाललेल्या एलॉन मस्क यांच्या सारख्या उद्योगपतीला सन्मानाने महाराष्ट्रात निमंत्रीत करण्याचे काम त्यावेळी मंत्री असणाऱ्या जयंत पाटील यांनी पार पाडले होते. सर्व, सोयी, सुविधा देण्याचेही आश्वासन दिले होते. भारतात केवळ जयंत पाटील यांनीच हे औदार्य दाखविले होते. एलॉन मस्क भारतात येत असल्याचे वृत्त काही तासांपूर्वी समजल्याने त्यापार्श्वभूमीवर मी ही मागणी करीत आहे. असे सादिक खाटीक यांनी स्पष्ट



जयंतराव पाटील



सादिक खाटिक

केले.
प्रारंभी रियाज शेख यांनी उपस्थितांचे स्वागत केले . राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलच्या सांगली जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल जालिंदर कटरे यांचा सत्कार करणेत आला.
यावेळी जालींदर कटरे, विकासराव देशमुख, अतुल जावीर इत्यादींची भाषणे झाली.
कार्यक्रमास सामाजीक कार्यकर्ते मुस्लीम समाजाचे नेते इंजिनियर असिफ कलाल, अजय कडव, साहेबराव कदम, पांडुरंग पुकळे, धुळाजी ठेंगले, असिफ उर्फ बाबु खाटीक, अमीर खाटीक, रियाज शेख, शब्बीर मुलाणी, गुंड्या उर्फ इम्रान शेख, रॉमी शेख, इम्रान याशीन शेख असिफ कुरेशी-भडाळे, दत्तात्रय लांडगे, इरफान शेख, शब्बीर मुलाणी, सौ. रेश्मा बंडगर, सौ. मुमताज खाटीक, सौ.उज्वलाताई केंगार, सौ.शुभांगी जवळे, सौ.गोकुळा शंकरराव हाके, श्रीमती कोंदनबी शेख, सौ. रशिदा महंमद शेख, सौ. शबनम शेख, समिना शेख, श्रीमती रशिदाबी खाटीक, श्रीमती शाबेरा बेपारी, सौ.राबियाँबसरी खाटीक इत्यादी अनेक जण उपस्थित होते. शेवटी असिफ उर्फ बाबु खाटीक यांनी आभार मानले.

## श्रीमती वेणुताई रसाळ याचा महसूल कडून सन्मानपत्र देवुन गौरव

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**म्हसवड/प्रतिनिधी :**
राज्यभरात सध्या सर्वत्रच महसुल सप्ताह सुरु असुन यानिमीत्त महसुल विभागाने दररोज एक उपक्रम हाती घेतला आहे, यानिमीत्त शासनाच्या विविध कल्याणकारी योजना नागरीकांच्या पर्यंत पोहचवण्यासाठी प्रशासन प्रयत्न करीत असुन याचाच एक भाग म्हणुन स्वातंत्र्य सैनिक अथवा त्यांच्या पत्नीचा गौरव केला जात आहे, म्हसवड शहरातील दिवंगत जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी हरि गोविंद रसाळ यांच्या पत्नी श्रीमती वेणुताई रसाळ यांचा सन्मानपत्र देवुन माण-खटावच्या प्रांताधिकारी उज्वला गाडेकर यांनी गौरव केला.
यावेळी म्हसवड चे मंडलाधिकारी शेंडे, गावकामगार तलाठी उत्तम आखडमल, अरुण सावंत, राजेश रसाळ माजी नगरसेविका रंजना रसाळ आदी प्रमुख उपस्थित होते. यावेळी प्रांताधिकारी गाडेकर म्हणाल्या की राज्यात सध्या महसुल सप्ताह सुरु असुन यानिमीत्त आज म्हसवड येथील दिवंगत जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी हरि गोविंद रसाळ यांच्या पत्नी चा प्रशासनाच्या वतीने गौरव होत आहे मला याचा अभिमान वाटतो आहे.



म्हसवड : येथे श्रीमती वेणुताई रसाळ यांचा सन्मानपत्र देवुन गौरव करताना प्रांताधिकारी उज्वला गाडेकर व उपस्थित मान्यवर

**शासनाने जागा द्यावी : श्रीमती रसाळ**

स्वातंत्र्य सैनिकांना शासन ठिकठिकाणी जागा उपलब्ध करुन देत आहे, तशी ती आम्हालाही उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी श्रीमती वेणुताई रसाळ यांनी प्रांताधिकारी गाडेकर यांच्याकडे करीत त्या जागेवर क्रांतिकारी हरि गोविंद रसाळ यांचे स्मारक उभारण्याचे आपले स्वप्न असल्याचेही त्यांनी सांगितले, तर हे स्मारक भावी पिढीसाठी प्रेरणादाई ठरेल असे ही श्रीमती रसाळ यांनी यावेळी स्पष्ट केले.













## २५ एकल महिलांना उद्योजिका घडविणार : अग्रणी संस्थेचा निर्धार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**विटा :** अग्रणी सोशल फौंडेशनच्या कार्यक्षेत्रातील २५ एकल महिला उद्योजिका घडविण्याचे लक्ष्य सर्व संचालिका व पदाधिकाऱ्यांनी ठरविले आहे. नारीशक्ती प्रकल्पाची सुरुवात विटा,लेंगरे ता.खानापूर व नेवरी ता. कडेगाव येथून करण्यात आली.
यावेळी साधन व्यक्ती व मार्गदर्शक म्हणून मुनीर शिकलगार हे होते.
अभियानासाठी संचालिका शोभाताई लोंढे, सुहासिनी शिंदे, करीना मुल्ला व पाकिजा शिकलगार यांनी योगदान दिले आहे.
अग्रणी सोशल फौंडेशन,विटा ही संस्था सांगली जिल्ह्यात वंचित, उपेक्षित, दुर्बल घटकामध्ये आर्थिक साक्षरता, उपजिवीका व कौशल्य विकास या विषयावर काम करत आहे. त्या अनुषंगाने खानापूर व कडेगाव तालुक्यातील एकल महिलांमध्ये उद्योजकीय मानसिकता तयार



विटा : व्यवसाय करण्यास इच्छुक महिलांकडून अर्ज भरून घेतना अग्रणी सोशल फौंडेशनचे पदाधिकारी

करण्यासाठी नारीशक्ती अभियान राबविण्यात सुरूवात झाली आहे. यामध्ये दर महिन्याला कार्यक्षेत्रात दोन ठिकाणी वंचित समुहातील एकल महिलांना व्यवसाय व उद्योगासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यासाठी तांत्रिक मार्गदर्शन अग्रणी संस्थेचे सहकार्य मिळत आहे.
यामध्ये एकल महिलांना उद्योग निवड, आवश्यक कागदपत्रे, विविध योजना, शासकीय अर्थसहाय्य, तांत्रिक माहिती व आर्थिक साक्षरता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. नारीशक्ती अभियानाची जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापिका शोभाताई लोंढे यांचेकडे असून सुहासिनी शिंदे, करीना मुल्ला व पाकिजा शिकलगार या प्रकल्प संचालिका म्हणून कार्यरत आहेत. प्रत्येक तालुक्यातील किमान पाच एकल महिला उद्योजिकांना सहकार्य करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
यावेळी व्यवसाय करण्यास इच्छुक महिलांकडून अर्ज भरून घेण्यात आले. तसेच अग्रणी सोशल फौंडेशनच्या संस्थेस सहकार्य व मार्गदर्शनासाठी पत्र देण्यात आले. या नारीशक्ती अभियानास शुभेच्छा देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते विलास सगरे, रिपाइं नेते दादासाहेब चंदनशिवे, काँग्रेसचे अल्लाबक्ष मुल्ला, सचिन लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते. तर जयमाला चव्हाण, मनिषा चव्हाण, फरिदा मणेर, यास्मिन काझी, विद्या घाडगे, पूनम चंदनशिवे, लक्ष्मी बुधावले, सारिका बुधावले, तब्बसूम मुल्ला, सुरैय्या मुल्ला, विद्या सुर्यवंशी या कार्यकर्त्यां उपस्थित होत्या.

# विट्यात दोन अट्टल चोरट्यास अटक

## एकाच तपासात पाच गुन्हे उघडकीस : रोख रक्कमेसह ६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**विटा :** विटा पोलिसांनी दोन अट्टल चोरट्यास अटक केली आहे. ओंकार हणमंत बोडरे (वय २०, ताकारी, ता. वाळवा ) आणि विशाल उर्फ आकाश भिमाशंकर जाधव (वय २४, सोन्याळ, ता. जत) अशी या दोघांची नावे असून त्यांचा साथीदार आकाश दीपक घाडगे (तुपारी, ता.वाळवा) हा फरार झाला आहे.



विटा : पोलिसांनी अटक केलेले आरोपी, जप्त केलेला मुद्देमाल व तपास करणारे अधिकारी

याबाबत विटा पोलिसांनी सांगितले की, विट्यातील सूर्यनगर येथील राहणारे प्रकाश बंडू सूर्यवंशी यांनी त्यांच्या शेळ्या चोरी झाल्याची फिर्याद पाच महिन्यांपूर्वी दिली होती. त्यानुसार अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. रात्री अकरा वाजता विटा पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पोलीस उत्तम माळी यांना खबऱ्याद्वारे दोन तरूण विनानंबर प्लेटच्या दुचाकीवरून विटा-आळसंद रस्त्यावरून फिरत असल्याची माहिती मिळाली. त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांच्याकडे असणारी दुचाकी आटपाडी येथून चोरल्याची तसेच ७६ हजार रुपये किंमतीच्या दहा शेळ्या, पन्नास हजाराची दुचाकी, वीस हजाराची पाण्यातील विद्युत मोटर, रोख सात हजार रुपये चोरल्याची कबुली दिली. वरील साहित्य आणण्यासाठी वापरण्यात आलेली पाच लाख रुपयांची चार चाकी जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक बसवराज तेली, अप्पर पोलीस अधीक्षक तुषार पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी पद्मा कदम, पोलीस निरीक्षक संतोष डोके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उत्तम माळी, अमोल कराळे, हेंमत तांबेवाघ, सुनील पाटील, प्रमोद साखरपे, महेश देशमुख, महेश संकपाळ, अक्षय जगदाळे, कॅप्टनसाहेब गुंडवाडे, अजय पाटील यांनी केली.

# म्हसवडमध्ये कॉँग्रेस कार्यकर्त्यांकडून साखर वाटून आनंद साजरा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** राहुल गांधी यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आलेली स्थगिती आणि रद्द करण्यात आलेली खासदार परत मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याने राष्ट्रीय कॉँग्रेस पक्षाचे नेते रणजीत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसवड येथे साखर वाटप व फटाके वाजवून आनंद साजरा करण्यात आला.


म्हसवड : येथे राहुल गांधी यांच्यावरील शिक्षेला सुप्रीम हायकोर्टाने स्थगिती दिल्याने कॉँग्रेस कार्यकर्त्यांनी साखर वाटप आनंद व्यक्त केला.

राहुल गांधी यांना याप्रकरणी अहमदाबाद हायकोर्टाने २ वर्षांची शिक्षा सुनावली होती. विशेष म्हणजे सुरत सेशन्स कोर्ट, सूरत डिस्ट्रिक्ट कोर्ट यांनीदेखील ही शिक्षा कायम ठेवली होती. त्यामुळे राहुल गांधी यांच्या अडचणी वाढल्या होत्या. राहुल गांधी यांना दोन वर्षाची शिक्षा सुनावण्यात आल्याने त्यांची खासदारकी देखील रद्द करण्यात आली होती. अहमदाबाद हायकोर्टाच्या या निकालाला आव्हान देणारी याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आली होती.

गेल्या काही दिवसांपासून या प्रकरणावर सुनवाणी सुरु होती. अखेर या प्रकरणी राहुल गांधी यांच्यावरील शिक्षेला सुप्रीम हायकोर्टाने स्थगिती दिली आहे. सुप्रीम कोर्टाच्या या निकालानंतर म्हसवड येथे साखर वाटप व फटाके वाजवून आनंद साजरा केला

सच्चाई कभी झुक नहीं सकती, राहुल गांधी तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है! अशा प्रकारे घोषणा देत सर्व सामान्य जनतेने आनंद व्यक्त केला. यावेळी माण तालुका राष्ट्रीय कॉँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बाबासाहेब माने, माण तालुका अल्प संख्याक सेलचे अध्यक्ष गब्बारभाई काझी, नानासाहेब राजमाने, शैलेश गांधी व सर्व कॉँग्रेस प्रेमी जनता उपस्थित होती.

# गरीबांचे प्रगतीचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम सहकार क्षेत्राने केले : अमित शहा


पुणे : येथे केंद्रीय सहकारी संस्था निबंधक कार्यालयाच्या डिजीटल पोर्टलचे उद्घाटन करताना केंद्रीय मंत्री अमित शहा. मंचावर उपस्थित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व मान्यवर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** छोट्या स्वरुपातील गुंतवणूकीच्या आधारे मोठे कार्य उभारण्याचे काम सहकाराच्या माध्यमातून झाले असून गरीबांचे प्रगतीचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम सहकार क्षेत्राने केले, असे प्रतिपादन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी केंद्रीय सहकारी संस्था निबंधक कार्यालयाच्या डिजीटल पोर्टलच्या उद्घाटन कार्यक्रमात केले. डिजिटल पोर्टलचा सर्वाधिक लाभ देशात सर्वात जास्त बहुराज्य सहकारी संस्था असलेल्या महाराष्ट्राला होईल, असेही श्री. शाह यावेळी म्हणाले.

चिंचवड येथे आयोजित या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री बी. एल. वर्मा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील,पालकमंत्री मंत्री चंद्रकांतदादा पाटील, केंद्रीय सहकार सचिव ज्ञानेश कुमार, विशेष सचिव तथा केंद्रीय निबंधक विजय कुमार, राज्याचे सहकार विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार आदी उपस्थित होते.

महाराष्ट्राचा 'देशाच्या सहकार क्षेत्राची राजधानी' असा उल्लेख करुन श्री. शाह म्हणाले, महाराष्ट्रातूनच सहकाराचे संस्कार देशात पोहोचले. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, धनंजय गाडगीळ, वैकुंठभाई मेहता अनेकांनी सहकार क्षेत्राला पुढे नेले. गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यात सहकार क्षेत्राने चांगली प्रगती केली आहे. म्हणूनच केंद्रीय निबंधक कार्यालयाच्या डिजीटायझेशनच्या कार्यक्रमाचा शुभारंभ पुणे येथून करण्यात येत आहे. बहुराज्य सहकारी संस्थांचे कामकाज पाहणाऱ्या केंद्रीय सहकार निबंधकाचे कामकाज पूर्णत: डिजीटल होत आहे. संस्थांना आपल्या कार्यालयातूनच निबंधक कार्यालयाशी संपर्क साधता येणार आहे. सहकारी संस्थांशी संबंधित सर्व कामकाज लक्षात घेऊन हे पोर्टल बनविण्यात आले अमित शहा म्हणाले. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

सोशल मिडिया डिझाईन
खास सवलतीच्या दरात
MANDESH GRAPHICS
* चालू घडामोडी/विकास कामांचे डिझाईन
* राजकीय डिझाईन
* सण/उत्सव/दिनविशेष डिझाईन
* जयंती/पुण्यतिथी डिझाईन
* वाढदिवस/आभार/अभिनंदन डिझाईन
आकर्षक डिझाइनसाठी त्वरित संपर्क- 94 21 750 650
PAYMENT UPI Paytm

माणदेश एक्सप्रेस
व्यवसायिक जाहिरात योजना
आपल्या व्यवसायाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी दैनिक 'माणदेश एक्सप्रेस' ने आणली आहे अल्प दरात जाहिरात योजना आहे.
आटपाडी तालुक्यासह सांगली तसेच माणदेशातील अग्रगण्य दैनिक माणदेश एक्सप्रेस च्या माध्यमातुन आपली जाहिरात ५० हजार लोकपर्यंत पोहचवा.
10 X 5 cm १००० /- रुपयात महिनाभर
10 X 10 cm २००० /- रुपयात महिनाभर
20 X 7 cm ३००० /- रुपयात महिनाभर
20 X 13 cm ४००० /- रुपयात महिनाभर
टीप : आतील पानासाठी हे दर १० टक्के कमी आहेत
याशिवाय विशेष स्किम, विविध योजांची माहिती देणाऱ्या बातम्यांना प्रसिद्धी दिली जाईल.
आजच संपर्क करा
९५९५०४७६७६, ९५०३६३८६८६

# बिजवडीत उच्छाद मांडलेल्या वानराला पिंजऱ्यात बंद करण्यात यश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** माण तालुक्यातील बिजवडी व बिजवडी पंचक्रोषीतील जनतेमध्ये वानराने अनेक नागरिकांना जायबंदी केले होते. त्यामुळे या वानराची बिजवडी गावामध्ये मोठी दहशत निर्माण झाली होती. परंतु सदर वानराला, अखेर वनविभाग दहिवडी यांनी सापळा रचत जाळीचे साह्याने पकडण्यात यश आले.


बिजवडी : येथे उच्छाद मांडलेल्या वानराला पकडण्यात यश मिळविलेले वनविभागानेचे कर्मचारी, बारामती येथील रेस्क्यू टीमचे सदस्य व संजय भोसले

काल रविवारी बिजवडी येथे सकाळी अमर हॉटेलमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख संजय भोसले व नागरिक बसले असता सदर वानर हॉटेल मध्ये शिरले. परंतु वानराने पूर्व नियोजीत सापळ्याला चकवा देवून सटकला. काही वेळाने पून्हा याच हॉटेलमध्ये येताच हॉटेलचे सर्व शटर व मुख्य दरवाजे बंद करण्यात आले. आतमध्ये वनविभाग कर्मचारी व रेस्कूय टीम सदस्य आणि जिल्हाप्रमुख भोसले व तर दोन इसम असताना रेस्कूय टीमने जाळी फेकताच वानराने एका कोपर्यात असलेल्या जिल्हाप्रमुख भोसले यांचेकडे सरकत आसरा घेत भोसले यांना घट्ट मिटी मारुन बसले. यावेळी जाळे टाकून व कंबरेला फास अडकवून वानराला जेरबंद करणेत यश आले.

> विचार शुध्द असलेने आणि श्रध्दा यामुळेच बिथरलेला वानराने माझ्या कमरेला पाच मिनिटे पकडून माझा आसरा करणे हे वस्तुनिष्ठ सत्य सर्व अधिकार्यांनी पहिले, आणि पुढील सर्वच अनर्थ टळला व वानर सहज पकडला गेला.
>
> **संजय भोसले**
>
> **शिवसेना जिल्हाप्रमुख सातारा**

या रेस्कूयमध्ये दहिवडी वन परिक्षेत्र अधिकारी अमोल मुळीक, वनपाल गलांडे, बारामती रेस्कूय टीमचे श्रेयस कांबळे व ऋषीकेष मोर, वनसंरक्षक नितीन जगदाळे, शिवसेना जिल्हाप्रमुख संजय भोसले आणि शेतकरी संघटनेचे प्रसिध्दीप्रमुख केशव जाधव यांनी सहभाग नोंदवला.

Dulux let's colour
कलर व त्यासाठी लागणारे सर्व साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण
सिध्दीविनायक कलर एजन्सी
कलरचे माहेरघर...
विजय कालीदास पाटील ८४०८८९९९९४/८४८४०७२४३४
राहूल कालीदास पाटील ७४२०९५०७०७/९८९०५०२३१०
पत्ता
दिघंची रोड जय भवानी बिल्डींग समोर, आटपाडी-शाखा १
दिघंची मायणी रोड दिघंची, शाखा-दिघंची २

# स्वेरीत 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' संपन्न

## इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगचा संयुक्त उपक्रम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पंढरपूर :** गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागांच्या संयुक्त विद्यमाने 'कन्व्हर्टींग इनोव्हेशन इन टू एन्ट्रप्रेन्युअरशीप अँड स्टार्टअप' या विषयावर दि. २४ जुलै ते दि.२९ जूलै २०२३ दरम्यान एक आठवड्याचा 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' हा कार्यक्रम संपन्न झाला. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या उपक्रमाचे उद्घाटन पुण्यातील निताल कॉम्प्युटर सिस्टम प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक सुदर्शन नातू यांच्या हस्ते झाले. दीप प्रज्वलनानंतर इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या विभागप्रमुख डॉ. दिप्ती तंबोळी यांनी प्रास्ताविकात हा 'फॅक्लटी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' आयोजित करण्यामागचा हेतू स्पष्ट केला. यावेळी कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.स्वाती पवार या उपस्थित होत्या. या प्रोग्राममध्ये सुदर्शन नातू, तुषार मेहता, डॉ.प्रशांत पवार, गिरिश संपथ, डॉ.दिप्ती तंबोळी, डॉ.विद्याराणी क्षीरसागर, मयांक बॅनर्जी, डॉ.प्रशांत मंडलके, दादासाहेब रोंगे, सुहास उलगडे, अरकस बापू दिलीप, रणजीत शिंदे, अशोक सराफ, सौ.भावना अंबुडकर, यांच्यासह आठवडाभर चाललेल्या या फॅक्लटी डेव्हलपमेंट प्रोग्राम मध्ये १०० पेक्षा अधिक प्राध्यापकांनी सहभाग घेतला. सहभागी प्राध्यापकांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. या प्रोग्राम मध्ये अनेक संशोधक, प्राध्यापक व तज्ञांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी व्यासपीठावर स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, सौ.नातू, संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ.अमरजित केने यांच्यासह प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.



पंढरपुर : स्वेरी मध्ये इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागांच्या संयुक्त विद्यमाने 'कन्व्हरटींग इनोव्हेशन इन टू एन्ट्रप्रेन्युअरशीप अँड स्टार्टअप' या विषयावर आयोजिलेल्या 'फॅक्लटी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम'चे उदघाटन करताना उपस्थित मान्यवर

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दोन्ही विभागांच्या प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ.एम.पी.ठाकरे व प्रा.पी. डी. माने यांनी काम पाहिले. सुत्रसंचालन प्रा.एस.व्ही. मोहोळकर, प्रा.निमिशा देवल यांनी केले. कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.स्वाती पवार यांनी आठवडाभर चाललेल्या 'फॅक्लटी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' आपल्याला भविष्यात कशाप्रकारे उपयोगी आहे? याबद्दल अभ्यासपूर्ण विचार मांडून उपस्थितांचे आभार मानले.

स्वच्छ भारत, सुंदर भारत
स्वच्छ घर, सुंदर घर
खुषखबर! खुषखबर!! खुषखबर!!!
आम्ही आपल्यासाठी घेवून आलो आहोत..........
माणगंगा
सेफ्टीटँक ड्रेनेज क्लीनिंग सर्व्हिस
आपली संडास टाकी, शोषखड्डा, गोबर गॅस टाकी भरलेली आहे का ......... ?
चिंता करू नका......
फक्त खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर फोन लावा.
आपली संडास टाकी, आधुनिक मशिनच्या सह्याने एकदम वाजवी दरात स्वच्छ करून दिली जाईल.
किरण रणदिवे
7028723789 / 9921030708
टिप :- कृपया फोन करा व जहिरात जपून ठेवा, शेजाऱ्याना उपयोगात येईल.